# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस आयुक्त, मिरा–भाईंदर,वसई–विरार
### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२–२९४५१००१
Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्र २६–२२ दिनांक ३१/०१/२०२२

## दिल्ली येथुन घरातून निघून आलेली अल्पवयीन मुलगी रिक्षा चालकाच्या संवेदनशीलतेमुळे पालकांच्या स्वाधीन.

दिनांक २९/०१/२०२२ रोजी सकाळी ०६.३० वा. वाजताच्या सुमारास वसई पुर्व रेल्वे स्टेशन जवळ रिक्षा चालक नामे श्री. राजु कचरू करवाडे हे त्यांची ऑटो रिक्षा क्र. एम एच ४८ ए एक्स ९०६० हि घेवुन नियमीत प्रवासी वाहतुक करण्यासाठी जात असतांना तेथे अंदाजे १४ वर्षाच्या मुलीने त्यांना हात दाखवुन रिक्षा थांबविली व विचारले की, मला येथे राहण्यासाठी एखादी रूम मिळेल का? तेव्हा रिक्षाचालक श्री. राजु कचरू करवाडे यांनी तिला तीचे नांव गांव विचारले असतां तिने सांगितले की, ती एकटी दिल्ली येथुन निघुन आली असुन तीला येथील परिसर माहित नाही. तेव्हा रिक्षा चालकाने तिचे ओळखपत्र बघितले असतां त्यांचे लक्षात आले की, सदरची मुलगी ही खरे बोलत असुन ती अल्पवयीन आहे. तेव्हा रिक्षाचालक राजु करवाडे यांनी तेथील वाहतुक पोलीस अंमलदार राकेश लोहकरे यांच्याशी तात्काळ फोनवर संपर्क साधुन त्यांना सदरील माहिती सांगितली असता पोलीस अंमलदार लोहकरे यांनी सदर मुलीस माणिकपुर पोलीस ठाणे येथे घेवुन येणेबाबत सांगितले. रिक्षाचालक श्री. राजु करवाडे हे सदर मुलीस माणिकपुर पोलीस ठाणे येथे घेवुन आले. त्यावेळी कर्तव्यावर असलेले पोलीस नाईक/१२००४ विकास ताकवाले यांनी सदर मुलीचे नांव व पत्ता याची खात्री करून दिल्ली येथील साकेत पोलीस ठाणे येथे संपर्क साधला असता माहिती प्राप्त झाली की, सदर अल्पवयीन मुलगी वय १४ वर्षे नवी दिल्ली हिला तिचे आईने अभ्यास करण्यावरून रागावल्याने सदर मुलगी ही घरातुन दिनांक २८/०१/२०२२ रोजी रागाच्या भरात निघुन आलेली आहे व त्याबाबत साकेत पोलीस ठाणे दिल्ली येथे अपहरणाचा गुन्हा दाखल आहे. तेव्हा पोलीस नाईक विकास ताकवले यांनी सदर मुलीचे वडिलांशी संपर्क साधुन त्यांची मुलगी मिळुन आली असल्याबाबत माहिती दिल्याने तिचे आईवडील तिला घेण्यासाठी दिल्ली येथुन विमानाने निघुन मुंबईला आले व तदनंतर माणिकपुर पोलीस ठाणे येथे समक्ष येवुन त्यांच्या मुलीस ताब्यात घेतले. सदर मुलीच्या पालकाने रिक्षाचालक राजु करवाडे व माणिकपुर पोलीस ठाणेच्या पोलीसांचे आभार मानुन कृतज्ञता व्यक्त केली आहे.

अल्पवयीन मुलगी ही रिक्षाचालक श्री. राजु कचरू करवाडे यांचे संवेंदनशीलतेमुळे तात्काळ तिचे आईवडीलांचे ताब्यात देणे शक्य झाल्याने पोलीसांनी त्यांचा पुष्पगुच्छ देवुन सत्कार केला.

